30414

मुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
कोकण भवन, नवी मुंबई४०० ६१४

दिनांक 21 JUN 2003

कार्यालयीन आदेश क्रमांक ६८ दिनांक १९/६/2003

विषय :- जिल्हा परीषद लेखा परीक्षण पुर्ण केल्यानंतर हाती घेतलेल्या नगरपरीषद व संकिर्ण लेखा परीक्षणाचा आढावा घेणे बाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र. स्था-१८/ब/सभा/एसए/७०४ दिनांक ६/५/२००३.

दिनांक ८ व ९ एप्रिल २००३ रोजी नाशिक येथे आयोजित केलेल्या स्थानिक निधी लेखा विभागाच्या विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांच्या बैठकीत उपरोक्त विषयावर विस्तृत चर्चा होऊन खालिल प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१] सर्व नगरपालिका, नगरपालिका शिक्षण मंडळे आणि संकिर्ण संस्थाचे लेखापरीक्षण माहे मे २००३ अखेर पुर्ण करावे आणि लेखा परीक्षण अहवाल विहीत वेळेत निर्गमित करावेत.

२] संकिर्ण संस्थाचे लेखापरीक्षण हाती घेताना शक्यतो ज्या संस्थाचे लेखा परीक्षण शुल्क आकारणीच्या अटीवर घेण्यात येते अशा संस्थाचे लेखापरीक्षण प्रथम हाती घेण्यात यावे आणि अशा संस्थाचे लेखापरीक्षण थकीत रहाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

३] सर्व विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांनी त्यांच्या त्यांच्या विभागात या संस्थाचे लेखापरीक्षण निश्चित केलेल्या वेळेत पुर्ण होत आहे आणि लेखापरीक्षण अहवाल विहीत वेळेत निर्गमित होत आहेत याचा पाठपुरावा करावा.

मुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा,
नवी मुंबई.

प्रत :- माहितीस्तव व पुढील सस्नेह कार्यवाहीसाठी अग्रेषित.
१] उपमुख्य लेखा परीक्षक [वरीष्ठ] स्थानिक निधी लेखा
२] उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा
३] उपमुख्य लेखा परीक्षक, [अहवाल] स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
४] सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, अहवाल
५] सहाय्यक अधिक्षक [अहवाल]
६] उच्चस्तर लिपीक १ / २ / ३ / ४
७] अभिलेखापाल [२ प्रती].